राज्यात मेंढी पालनाच्या व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजनेंतर्गत "राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" या नावाने ६ मुख्य घटकांसह नवीन योजना सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पविआ-१०१७/प्र.क्र.६५/पदुम-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २ जून, २०१७

प्रस्तावना :-

राज्यातील धनगर व तत्सम जमातींमधील सुमारे १ लाख मेंढपाळांकडून मेंढीपालन हा व्यवसाय केला जातो. धनगर व तत्सम जमातींमधील समाज सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्टया मागास असल्यामुळे या समाजास भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट करून, त्यांना मागासवर्गीयांच्या सवलती राज्य शासनाने लागू केलेल्या आहेत. सध्या राज्यातील मेंढपाळ विविध ऋतूनुसार मेंढयांसाठी जेथे चारा उपलब्ध होईल अशा विविध ठिकाणी भटकंती करुन मेंढयांचे पालन पोषण करण्याचा व्यवसाय करीत आहेत.

२. राज्यातील मेंढ्यांच्या संख्येत होणारी प्रागतिक घट, घटीची कारणे, मेंढ्यांपासून मिळणाऱ्या मांस व दुधाचा उच्च दर्जा, तसेच दूध व लोकर उत्पादनापासून निर्माण होणाऱ्या रोजगारांची संधी या पार्श्वभूमीवर राज्यातील भटक्या जमाती (भज-क) या मेंढपाळ समाजास सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याच्या दृष्टीने मेंढीपालन या पारंपारिक व्यवसायास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

३. मा. मंत्री (वित्त) यांनी सन २०१७-१८ चा अर्थसंकल्प विधीमंडळात सादर करताना दि. १८ मार्च, २०१७ रोजी **"राज्यात मेंढी पालनास प्रोत्साहन देण्यासाठी ७५ टक्के अनुदानावर मेंढीगटाचे वाटप करणे"** ही नवीन योजना सुरू करण्याची घोषणा केली असून,

ती खालील प्रमाणे आहे:-

"राज्यात मेंढी पालनास प्रोत्साहन मिळण्यासाठी पारंपारिक मेंढी पालन करणाऱ्या लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर मेंढी गटाचे वाटप करण्यात येईल. यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. योजनेची फलश्रुती लक्षात घेऊन व्याप्ती वाढविण्याबाबत नंतर विचार करण्यात येईल."

४. मा.मंत्री (वित्त) यांच्या उक्त घोषणेच्या अनुषंगाने राज्यस्तरीय योजनेअंतर्गत **"राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" या नावाने ६ मुख्य घटकांसह** नवीन योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून राबविण्यासाठी दिनांक- २२ मे,२०१७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर योजना राज्यात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णयः-

५. **"राजे यशवंतराव होळकर महामेष योजना"** या नावाने खालील ६ मुख्य घटकांसह नवीन योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ जिल्ह्यात राबविण्यासाठी याद्वारे शासन मान्यता देत आहे.

६. **योजनेचे उद्देश :-**

(१) राज्यातील भटकंती करणारे मेंढपाळ पारंपारिक पद्धतीने करीत असलेल्या मेंढीपालन या व्यवसायापासून त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत निर्माण करून देणे व त्याद्वारे त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करणे.

(२) राज्यामध्ये अर्धबंदिस्त / बंदिस्त मेंढीपालन व्यवसायास चालना देणे.

(३) मेंढीपालनाचा पारंपारिक व्यवसाय असणाऱ्या समाजातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.

(४) दरडोई प्रती वर्ष प्रत्येक व्यक्तींच्या आहारामध्ये आवश्यक असणाऱ्या मांसाच्या उपलब्धतेमध्ये वाढ करणे.

(५) राज्यामधील सातत्याने कमी होत असलेल्या मेंढ्यांच्या संख्येमध्ये वाढ करून, राज्याच्या कृषि व संलग्न क्षेत्रातील स्थूल उत्पन्न वाढीच्या दराचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत करणे.

(६) उच्च प्रतीच्या सुधारीत नर मेंढ्यांद्वारे पारंपारिक प्रजातीच्या मेंढ्यांची अनुवंशिकता सुधारणे.

(७) उन्हाळ्याच्या व टंचाईच्या कालावधीमध्ये चारा अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने, मेंढ्यांच्या वजनात घट होते. त्याचप्रमाणे मेंढपाळांची भटकंती वाढते, यासाठी स्थायी स्वरुपाच्या ठाणबंद पध्दतीने मेंढीपालन करण्यासाठी मेंढपाळांना आकर्षित करुन त्यांना स्थैर्य निर्माण करुन देणे.

(८) राज्यामध्ये जास्तीत जास्त सुधारीत प्रजातीच्या मेंढ्यांचा प्रसार करण्यावर भर देणे.

७. **योजनेचे स्वरूप-**

**सदर योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू असेल.**

**(अ) पायाभूत सोई-सुविधेसह २० मेंढ्या + १ मेंढानर असा मेंढी गट वाटपः-**

(१) या योजनेमध्ये सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षापासून २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढी गट मुलभूत सुविधेसह एकूण १००० लाभार्थ्यांना वाटप करणे. सदर योजनेमध्ये ७५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा व २५ टक्के हिस्सा लाभार्थ्यांचा असेल.

(२) सदर योजनेअंतर्गत २० मेंढया + १ मेंढानर या स्थायी स्वरुपाचे ५०० मेंढी गट व स्थलांतरीत स्वरुपाचे ५०० मेंढी गट असे एकूण १००० मेंढी गटाचे वाटप करण्यात येईल.

(३) २० मेंढ्या + १ मेंढानर या स्थायी मेंढी गटाची एकूण किंमत रु. ३,३३,०००/- आणि स्थलांतरीत मेंढी गटाची एकूण किंमत रु. २,०२,५००/- राहील.

(४) २० मेंढ्या + १ मेंढानर या स्थायी मेंढी गटाच्या किंमती मधील २५ टक्के हिस्सा म्हणजे रु. ८३,२५०/- आणि स्थलांतरीत मेंढी गटाच्या किंमती मधील २५ टक्के हिस्सा रु. ५०,६२५/- एवढी रक्कम स्वहिस्सा म्हणून लाभधारकाने भरावयाची आहे. उर्वरित ७५ टक्के रक्कम स्थायी गटासाठी रु. २,४९,७५०/- आणि स्थलांतरीत गटासाठी रु. १,५१,८७५/- एवढे शासनाचे अनुदान अनुज्ञेय असेल.

(५) या योजनेअंतर्गत वाटप करण्यात येणाऱ्या मेंढ्यांची किंमत, मेंढी रु. ८०००/- व नर मेंढा रु. १००००/- याप्रमाणे असेल. तथापि, जिवंत वजनानुसार लाभधारकाने निवडलेल्या मेंढयांची किंमत त्यापेक्षा जास्त होत असल्यास, जास्त होणारी रक्कम लाभधारकास स्वत: भरावी लागेल. त्यासाठी शासनाचे कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

(६) या संदर्भातील बाब निहाय खर्चाचा तपशील सोबतच्या **विवरणपत्र "अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**(ब) सुधारीत प्रजातीच्या नर मेंढ्यांचे वाटप:-**

(१) या योजनेतंर्गत पहिल्या टप्प्यात ५३४० सुधारीत जातीच्या नर मेंढयाचे वाटप करण्यात येईल.

(२) सुधारीत प्रजातीच्या एका नर मेंढ्याची किंमत रु. १०,०००/- एवढी असेल. सदर किंमती मधील २५टक्के हिस्सा म्हणजे रु. २,५००/- एवढी रक्कम स्वहिस्सा म्हणून लाभधारकाने भरावयाची आहे, आणि उर्वरित ७५टक्के हिस्सा म्हणजे रु. ७,५००/- एवढ्या रकमेचे शासनाचे अनुदान अनुज्ञेय असेल.

(३) या योजनेंतर्गत वरील **मेंढी गट योजनेचे** लाभार्थी नसलेल्या व ज्यांच्याकडे स्वत:च्या २० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० पेक्षा कमी मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना १ नर मेंढा, ४० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ६० पेक्षा कमी मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना २ नर मेंढे, ६० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ८० पेक्षा कमी मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना ३ नर मेंढे, ८० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु १०० पेक्षा कमी मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना ४ नर मेंढे आणि १०० किंवा त्यापेक्षा अधिक मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना ५ नर मेंढ्यांचे वाटप करण्यात येईल.

(४) या योजनेंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या नियंत्रणाखालील प्रक्षेत्रावरील उपलब्ध असलेले नर मेंढे वाटप करण्यात येतील. तसेच आवश्यकतेनुसार महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी यांच्याकडील मेष प्रकल्पांतर्गत उपलब्ध असलेले नर मेंढे (दख्खनी, माडग्याळ इ.) घेण्यात येतील. त्याचप्रमाणे स्थानिक सुधारीत जातीचे किंवा इतर राज्यातील किंवा विदेशी नर मेंढे आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध करुन वाटप करण्यात येतील.

**(क) मेंढीपालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अनुदान वाटप:-**

(१) वरील **मेंढी गट योजनेचे** लाभार्थी नसलेल्या, व ज्यांच्याकडे स्वत:च्या मेंढ्या आहेत, अशा मेंढपाळास ७५ टक्के अनुदान तत्वावर मेंढीपालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करुन देणे.

(२) सदर योजनेंतर्गत स्वत:च्या २० मेंढ्या + १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेढ्यांपेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या **स्थायी स्वरुपाचे** मेंढीपालन करणाऱ्या ५० लाभार्थ्यांना व **स्थलांतरीत स्वरुपाचे** मेंढीपालन करणाऱ्या ४५० लाभार्थ्यांना, अशा एकूण ५०० लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात येईल.

(३) सदर योजनेंतर्गत स्वत:च्या ४० मेंढ्या + २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक मेंढ्यांचे **स्थायी स्वरुपाचे** मेंढीपालन करणाऱ्या ५० लाभार्थ्यांना व **स्थलांतरीत स्वरुपाचे** मेंढीपालन करणाऱ्या ४५० लाभार्थ्यांना अशा एकूण ५०० लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात येईल.

(४) २० मेंढ्या + १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेढ्यांपेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या स्थायी स्वरुपाच्या आणि स्थलांतरीत स्वरुपाच्या मेंढीपालनासाठी पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सोई-सुविधांची एकूण किंमत अनुक्रमे रु. १,६३,०००/- आणि रु. ३२, ५००/- एवढी राहील.

(५) २० मेंढ्या + १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेढ्यांपेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या स्थायी स्वरुपाच्या मेंढीपालनासाठी पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सोई-सुविधांच्या किंमती मधील २५टक्के हिस्सा म्हणजे रु. ४०,७५०/- आणि स्थलांतरीत स्वरुपाच्या मेंढीपालनासाठी पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सोई-सुविधांच्या किंमती मधील २५ टक्के हिस्सा रु. ८,१२५/- एवढी रक्कम स्वहिस्सा म्हणून लाभधारकाने भरावयाची आहे. स्थायी मेंढीपालनासाठी उर्वरित ७५टक्के हिस्सा रु. १,२२,२५०/- आणि स्थलांतरीत मेंढीपालनासाठी रु. २४,३७५/- एवढे शासनाचे अनुदान अनुज्ञेय असेल.

(६) ४० मेंढ्या + २ मेंढेनर अशा एकूण ४२ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक मेंढ्यांच्या स्थायी स्वरुपाच्या मेंढीपालनासाठी आणि स्थलांतरीत स्वरुपाच्या मेंढीपालनासाठी पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सोई-सुविधांची एकूण किंमत अनुक्रमे रु. ३,१७,०००/- आणि रु. ४८,०००/- एवढी राहील.

(७) ४० मेंढ्या + २ मेंढेनर अशा एकूण ४२ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक मेंढ्यांच्या स्थायी स्वरुपाच्या मेंढीपालनासाठी पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सोई-सुविधांच्या किंमती मधील २५ टक्के हिस्सा म्हणजे रु. ७९,२५०/- आणि स्थलांतरीत स्वरुपाच्या मेंढीपालनासाठी पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सोई-सुविधांच्या किंमती मधील २५ टक्के हिस्सा म्हणजे रु. १२,०००/- एवढी रक्कम स्वहिस्सा म्हणून लाभधारकाने भरावयाची आहे. उर्वरित ७५ टक्के हिस्सा स्थायी मेंढीपालनासाठी रु. २,३७,७५०/- आणि स्थलांतरीत मेंढीपालनासाठी रु. ३६,०००/- एवढे शासनाचे अनुदान अनुज्ञेय असेल.

(८) या संदर्भातील बाब निहाय खर्चाचा तपशील सोबतच्या **विवरणपत्र "ब"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**(ड) मेंढीपालनासाठी संतुलीत खाद्य उपलब्ध करुन देण्यासाठी अनुदान वाटपः-**

(१) वरील **मेंढी गट** योजनेचे लाभार्थी नसलेल्या, व ज्यांच्याकडे स्वतःच्या मेंढ्या आहेत, अशा मेंढपाळास मेंढीपालनासाठी ७५ टक्के शासनाचा हिस्सा व २५ टक्के लाभार्थ्यांचा हिस्सा या तत्वावर संतुलीत खाद्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

(२) स्थलांतरीत मेंढपाळांकडील मेंढ्यांसाठी त्यांच्या मूळ रहिवाशी ठिकाणी परतल्यावर माहे जून ते जुलै या कालावधीत संतुलीत खाद्य पुरविण्यात येईल आणि ज्या मेंढ्यांचे स्थलांतर न होता, स्थायी स्वरुपात मेंढीपालन केले जाते, त्या मेंढ्यांसाठी माहे एप्रिल ते जुलै या कालावधीत संतुलीत खाद्य पुरविण्यात येईल.

(३) राज्यातील एकूण मेंढ्यांची संख्या २५.८० लक्ष एवढी असून, त्यापैकी ५० टक्के म्हणजे १२.९० लक्ष एवढ्या मेंढ्यांना संतुलीत खाद्य पुरविण्यात येईल.

(४) उक्त १२.९० लक्ष मेंढ्यांपैकी ९० टक्के मेंढ्या म्हणजे ११.६१ लक्ष एवढ्या मेंढ्या स्थलांतरीत होतात असे ग्राह्य धरुन, या मेंढ्यांना माहे जून ते जुलै या कालावधीत प्रति दिन, प्रति मेंढी १०० ग्रॅम संतुलीत खाद्य पुरविण्यात येईल.

(५) उक्त १२.९० लक्ष मेंढ्यांपैकी १० टक्के मेंढ्या म्हणजे १.२९ लक्ष एवढ्या मेंढ्यांचे स्थायी स्वरुपात मेंढीपालन केले जाते असे ग्राह्य धरुन, या मेंढ्यांना माहे एप्रिल ते जुलै या कालावधीत प्रति दिन, प्रति मेंढी १०० ग्रॅम संतुलीत खाद्य पुरविण्यात येईल.

(६) सदर योजनेत स्थलांतरीत मेंढ्यांसाठी ६९६७.०२९ मेट्रीक टन एवढ्या आणि स्थायी मेंढ्यांसाठी १५४८.२२९ मेट्रीक टन एवढ्या संतुलीत खाद्याची आवश्यकता आहे. प्रति किलो पशुखाद्याची किंमत रु. २५/- एवढी असून, त्यापैकी २५ टक्के लाभार्थी हिस्सा म्हणजे रु. ६.२५/- आणि ७५ टक्के शासनाचा हिस्सा म्हणजे रु. १८.७५/- एवढा राहील.

(७) सदर योजनेंतर्गत मेंढपाळ जेवढे पशुखाद्य घेईल, त्या प्रमाणात त्यास शासनाचे अनुदान अनुज्ञेय असेल.

**(इ) कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मूरघास बनविण्याकरीता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler cum Wrapper) खरेदी करण्यासाठी अनुदान वाटपः-**

राज्यात २५ ठिकाणी कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मूरघास बनविण्याकरीता गासड्या बांधण्याचे (Mini Silage Baler cum Wrapper) यंत्राची किंमत रु. ८.०० लक्ष एवढी ग्राह्य धरुन, त्यापैकी ५० टक्के म्हणजेच रु. ४.०० लक्ष इतक्या मर्यादेपर्यंत किंवा प्रत्यक्ष यंत्राच्या किमतीच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल इतके आर्थिक सहाय्य अनुदान स्वरुपात प्रति यंत्र, असे २५ यंत्रासाठी अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

**(फ) पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी अनुदान वाटपः-**

राज्यात ५ ठिकाणी पशुखाद्य कारखाने निर्माण होण्यासाठी एका पशुखाद्य कारखान्यासाठी रु. १०.०० लक्ष एवढा खर्च ग्राह्य धरुन, त्यापैकी ५० टक्के म्हणजेच रु. ५.०० लक्ष मर्यादेपर्यंत किंवा प्रत्यक्ष यंत्राच्या किमतीच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल इतके आर्थिक सहाय्य अनुदान स्वरुपात प्रति कारखाना याप्रमाणे ५ कारखान्यासाठी अनुदान वाटप करण्यात येईल.

**(ग) सर्वसाधारण स्वरुपः-**

(१) सदर योजनेअंतर्गत राज्यातील मेंढपाळांना राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सुरू असलेल्या मुरघास बनविण्याचे युनिट स्थापन करणे या योजनेचा लाभ घेता येईल .

(२) या योजनेअंतर्गत कायमस्वरुपी एका ठिकाणी राहून मेंढीपालन करणारे व स्थलांतर पध्दतीने मेंढीपालन करणारे अशा दोन प्रकारच्या लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

(३) सदर योजनेअंतर्गत भटक्या जमाती (भज-क) प्रवर्गातील बचतगटांना / पशुपालक उत्पादक कंपन्यांना लाभार्थी म्हणून प्राधान्य देण्यात येईल.

(४) कायमस्वरुपी एका ठिकाणी राहून मेंढीपालन करणाऱ्या लाभार्थ्यांना शेड बांधकाम, मोकळ्या जागेस कुंपण, खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी, फायबरची बादली आणि इतर साहित्य, जंतनाशके, कीटकनाशके औषधे व खनिज विटा, पशुधनाचा विमा, चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातींचे ठोंबे/बियाणे या बाबींसाठी अनुदान देण्यात येईल.

(५) स्थलांतर पध्दतीने मेंढीपालन करणाऱ्या लाभार्थ्यांना खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी, तंबू, सूती वाघूर, स्थलांतरणाच्या वेळी साहित्य वाहतूक करण्याकरिता खोगीर, फायबरची बादली आणि इतर साहित्य, जंतनाशके, कीटकनाशके औषधे व खनिज विटा, पशुधनाचा

विमा, चारा विकत घेणे अथवा मेंढ्या चारण्यासाठी कुरण भाड्याने घेणे या बाबींसाठी अनुदान देण्यात येईल.

(६) या योजनेंतर्गत कायमस्वरुपी ठाणबंद पध्दतीने मेंढीपालन करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या लाभधारकाने त्यांच्याकडील मेंढ्यांकरीता वर्षभरासाठी चाऱ्याची उपलब्धता कशाप्रकारे करुन देण्यात येईल, याबाबतचे नियोजन महामंडळाकडे सादर करणे आवश्यक राहील.

(७) शेड बांधण्याकरीता स्वत:ची जागा असणे आवश्यक आहे. लाभधारकाने शेडचे बांधकाम व इतर आनुषंगिक साहित्यांची खरेदी केल्यानंतर या योजनेअंतर्गत पुरवठा करावयाच्या मेंढया/नर मेंढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्रांमार्फत पुरविण्यात येतील.

(८) महामंडळाच्या प्रक्षेत्रापासून ते लाभधारकांच्या ठिकाणापर्यंत मेंढ्यांच्या वाहतूकीवर होणारा खर्च हा लाभधारकांनी स्वत: करावयाचा आहे.

(९) या योजनेमधील कोणत्याही बाबीवरील होणारा अतिरिक्त खर्च हा लाभधारकांनी स्वत: करावयाचा असून, याकरीता कोणतेही शासनाचे अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

(१०) या योजनेमध्ये बांधावयाच्या शेडचा आराखडा महामंडळामार्फत लाभधारकांना देण्यात येईल.

(११) चारा बियाणे तसेच गवत प्रजातींचे ठोंबे / बेने इत्यादी महामंडळाच्या प्रक्षेत्रामार्फत लाभधारकांस पुरविण्यात येतील. लाभधारकांना स्वत:च्या जमिनीवर किंवा स्वत:ची जमिन नसल्यास, भाडेतत्वावर जमिन उपलब्ध करून चाऱ्याची लागवड करणे आवश्यक राहील.

(१२) या योजनेअंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या मेंढ्यांना आरोग्य सुविधा (लसीकरण, जंतनाशक औषध पाजणे इ.) नजीकच्या शासकीय / जिल्हा परिषदेच्या पशुवैद्यकीय दवाखान्यांमार्फत पुरविण्यात येतील. मेंढ्यांमध्ये असणारी खनिजांची कमतरता भरुन काढण्यासाठी खनिज मिश्रण /मिनरल मिक्श्चर ब्रिक्स पुरवठा करण्यात येतील.

(१३) या योजनेअंतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या मेंढ्यांना विमा संरक्षण देणे बंधनकारक राहील.

(१४) या योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या मेंढ्यांपासून लाभधारकांकडील उत्पादित झालेल्या मेंढ्यांची महामंडळास आवश्यकता भासल्यास, लाभधारकांनी मेंढ्यांचा पुरवठा महामंडळास करणे बंधनकारक राहील.

(१५) बहुतांशी कमी पावसाच्या प्रदेशात स्थलांतरीत पध्दतीने मेंढीपालन केले जात असल्याने, या मेंढ्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही व त्यामुळे त्यांच्यामध्ये अशक्तपणा व रोगांचे प्रमाण वाढते व बऱ्याचदा मृत्यूही ओढवतो. याकरिता त्यांच्या स्थलांतर मार्गावर शासकीय जागेत शेततळे किंवा वन विभागाची जागा असल्यास वनतळे करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी.

(१६) राज्यामध्ये मेंढीपालन व्यवसाय हा स्थलांतरण पद्धतीने केला जातो. स्थलांतरण काळामध्ये मेंढ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन, मेंढ्या आजारी पडण्याचे प्रमाण जास्त असते. यावर मात करण्याकरीता ज्या गावामध्ये जास्त मेंढ्या आहेत किंवा ज्या मार्गावरून मेंढ्यांचे स्थलांतरण होते, हे ठिकाण किंवा गाव ज्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये असेल त्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत अशा ठिकाणी दर आठवड्याला भेटी

देऊन मेंढ्यांना आरोग्य सुविधा देण्याची व्यवस्था करण्यात यावी. परंतु, याकरिता सदर योजनेंतर्गत कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

(१७) सदर योजनेंतर्गत वाटप करण्यात येणारे **मेंढी गट व नर मेंढे तसेच चारा बियाणे / ठोंबे / बेणे** यांचे वाटप पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत करण्यात येणार असल्याने नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक डिसीट २३१६ / प्र.क्र.१३३/ का.१४१७, दिनांक ३ मार्च, २०१७ या शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये नमूद साधनसामुग्री / वस्तुंच्या यादीतील अ.क्र. ४ येथील नमूद बाबीमधून या योजनेसाठी सूट देण्यात येत आहे.

(१८) या योजनांतर्गत उक्त अ.क्र. (१७) येथील बाबी वगळता उर्वरित सर्व बाबींचे लाभ थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेच्या माध्यमातून (डीबीटी) लाभार्थ्यास देण्यात यावेत.

(१९) या योजनेंतर्गत लाभार्थी निवडीमध्ये पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता लाभार्थी निवड समितीने घ्यावी.

(२०) या योजनेतंर्गत सर्व लाभार्थीना आधारकार्ड सोबत संलग्न करण्यात यावे.

(२१) केंद्र शासन/ राज्य शासनाद्वारे पीपीआर /घटसर्प व अन्य रोगप्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येतात. तसेच केंद्र शासनाच्या केंद्रीय लोकर विकास मंडळामार्फत विविध कार्यक्रम राज्यात राबविण्यात येतात. त्यावेळी पशुसंवर्धन विभागाकडे मेंढपालकांची व त्यांच्याकडील मेंढयाची संख्या व इतर अनुषांगिक माहिती नोंदविण्यात येते. प्रस्तुत योजना राबवितांना अशा कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या नोंदींचा आधार घेण्यात यावा.

८. <u>प्रस्तावित योजना राबविण्याचे कार्यक्षेत्र-</u>

(१) सदर योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी लागू राहील.

(२)सदर योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत राबविण्यात यावी.

(३) सदरची योजना राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात यावी.

(४) जिल्हानिहाय मेंढी गट वाटप करताना संबंधित जिल्ह्यातील मेंढ्यांची संख्या विचारात घेऊन, त्यानुसार त्या जिल्ह्यातील वाटप करावयाच्या गटांची संख्या महामंडळाकडून निश्चित करण्यात यावी.

९. <u>लाभार्थी निवडीचे निकष / अटी व शर्ती</u> :-

(१) ही योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू असेल.

(२) लाभधारकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.

(३) लाभधारकाची निवड करताना, महिलांकरिता ३० टक्के व अपंगाकरिता ३ टक्के आरक्षण देण्यात यावे.

(४) निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी महामंडळाच्या संबंधीत मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्रावर पाठविण्यात यावी आणि महामंडळाच्या प्रक्षेत्रामार्फत मेंढी गट, सुधारीत प्रजातीचे नर मेंढे, पायाभूत सोई-सुविधांसाठीचे साहित्य आणि पशुखाद्य इत्यादीच्या वाटपाची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(५) लाभार्थ्यास आधार कार्ड सोबत संलग्न करण्यात यावे.

(६) लाभार्थ्यांस सोबत घेऊन मेंढ्यांची निवड करण्यात यावी.

१०. **<u>जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समिती: -</u>**

मेंढी गट वाटप, नर मेंढे वाटप, पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करुन देणे व संतुलीत खाद्य उपलब्ध करुन देणे या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याची आणि लाभधारकांची निवड करण्याची प्रक्रिया खालील प्रमाणे गठीत जिल्हास्तरीय समितीमार्फत पूर्ण करण्यात यावी.

**समितीची संरचना:-**

| | |
|---|---|
| (१) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त : | अध्यक्ष |
| (२) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद : | सदस्य |
| (३) संबंधीत तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार ) : | सदस्य |
| (४) सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय : | सदस्य सचिव |

११. कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचे मूरघास बनविण्याकरीता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler cum Wrapper) खरेदी करण्यासाठी अनुदान देणे आणि पशुखाद्य कारखान्यासाठी अनुदान देणे, या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याची आणि लाभधारकांची निवड करण्याची प्रक्रिया खालील प्रमाणे गठीत करावयाच्या समितीमार्फत पूर्ण करण्यात यावी.

**समितीची संरचना:-**

| | |
|---|---|
| (१) आयुक्त पशुसंवर्धन : | अध्यक्ष |
| (२) सह सचिव / उप सचिव (पशुसंवर्धन): | सदस्य |
| (३) व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, | सदस्य सचिव |

१२. **प्रकल्प अंमलबजावणी अधिकारी:-**

व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे हे या योजनेची अंमलबजावणी करतील आणि विभागीय स्तरावर प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन व राज्यस्तरावर आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांचे या योजनेवर सनियंत्रण असेल.

१३. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौ. संदर्भ क्र.२ / १४३१, दि. ०५.०५.२०१७ आणि वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. २४६/१७/व्यय-२, दि. ०६.०५.२०१७ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०६०११०२४२३०००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A L Jarhad

Digitally signed by A L Jarhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3a541694f4adde98f10b788ee52cc7f9fd760b94f01019da2aca2a687a3d7c3a, cn=A L Jarhad
Date: 2017.06.03 15:25:23 +05'30'

(आ. लिं. जऱ्हाड)
सचिव (पदुम)

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे- ६७.
३. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई / नागपूर.
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,
७. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
८. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
९. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१०.मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
११.मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१२.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४.निवड नस्ती (पदुम- ३)

## विवरणपत्र-अ

**(शासन निर्णय क्र. पविआ-१०१७/प्र.क्र.६५/पदुम,३ दिनांक - २ जून, २०१७ सोबतचे विवरणपत्र- अ)**

**या राज्यस्तरीय योजनेंतर्गत २० मेंढ्या + १ मेंढानर या मेंढीगटाच्या बाबनिहाय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

(आकडे रुपयामध्ये)

| अ.क्रं | बाब | संख्या | किंमत (प्रती नग) | स्थायी गट | स्थलांतरीत गट |
|---|---|---|---|---|---|
| १ | पशुधन खरेदी | २० मेंढ्या | ८,०००/- | १,६०,०००/- | १,६०,०००/- |
| | | १ मेंढानर | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- |
| २ | शेड बांधकाम | २१ प्रौढ मेंढ्यांसाठी प्रत्येकी १० चौ. फूट प्रमाणे २१० चौ. फूट आणि २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फूट प्रमाणे १०० चौ. फूट असे एकूण ३१० चौ. फूट बांधकाम | रू. २५० प्रती चौ. फूट | ७७,५००/- | - |
| ३ | मोकळ्या जागेस कुंपण | २१ प्रौढ मेंढ्यांसाठी प्रत्येकी २० चौ. फूट प्रमाणे ४२० चौ. फूट आणि २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फूट प्रमाणे १०० चौ. फूट असे एकूण ५२० चौ. फूट बांधकाम | रू. १०० प्रती चौ. फूट | ५२,०००/- | - |
| ४ | खाद्याचे व पिण्याच्या पाण्याची भांडी - | २० मेंढया व १ मेंढानर गटाकरीता | - | १०,०००/- | - |
| ५ | तंबू, सूती वाघर, स्थलांतरणाच्या वेळी साहित्य वाहतूक करण्याकरिता वाहतूक पिशव्या, फायबर ची बादली, खाद्याचे व पिण्याच्या पाण्याची भांडी आणि इतर साहित्य | २० मेंढया व १ मेंढानर गटाकरीता | - | - | १५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | जंतनाशक, कीटकनाशक औषधे व खनिज विटा | २० मेंढया व १ मेंढानर गटाकरीता | - | २,०००/- | २,०००/- |
| ७ | पशुधनाचा विमा सेवाशुल्कासह | २० मेंढया व १ मेंढानर गटाकरीता | पशुधनाच्या किंमतीवर @ ४ टक्के + सर्व्हिस टॅक्स | ८,५००/- | ८,५००/- |
| ८ | चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातींचे ठोंबे/बेने खरेदी तसेच अझोला व मूरघास तयार करणे | २० मेंढया व १ मेंढानर गटाकरीता | - | ११,०००/- | - |
| ९ | मेंढ्या चारण्यासाठी कुरण भाड्याने घेणे किंवा चारा विकत घेणे | २० मेंढया व १ मेंढानर गटाकरीता | - | - | ५,०००/- |
| १० | प्रशिक्षण | - | २,०००/- | २,०००/- | २,०००/- |
| ११ | एकूण किंमत | - | - | ३,३३,०००/- | २,०२,५००/- |
| १२ | अनुदान @ ७५ टक्के | - | - | २,४९,७५०/- | १,५१,८७५/- |
| १३ | लाभधारक हिस्सा २५ टक्के | - | - | ८३,२५०/- | ५०,६२५/- |

## विवरणपत्र - ब

**(शासन निर्णय क्र. पविआ-१०१७/प्र.क्र.६५/पदुम,३ दिनांक - २ जून, २०१७ सोबतचे विवरणपत्र- ब)**

**(१) या राज्यस्तरीय योजनेंतर्गत २० मेंढ्या + १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक आणि ४० मेढ्यांपेक्षा कमी मेंढ्या असलेल्या मेंढपाळास मेंढीपालनासाठी पायाभूत सोई-सुविधेकरीता येणाऱ्या बाबनिहाय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

(आकडे रुपयामध्ये)

| अ.क्र | बाब | संख्या | किंमत (प्रती नग) | स्थायी मेंढीपालन लाभार्थी | स्थलांतरीत मेंढीपालन लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेड बांधकाम | २१ प्रौढ मेंढ्यांसाठी प्रत्येकी १० चौ. फूट प्रमाणे २१० चौ. फूट आणि २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फूट प्रमाणे १०० चौ. फूट असे एकूण ३१० चौ. फूट बांधकाम | रू. २५० प्रती चौ. फूट | ७७,५००/- | - |
| २ | मोकळ्या जागेस कुंपण | २१ प्रौढ मेंढ्यांसाठी प्रत्येकी २० चौ. फूट प्रमाणे ४२० चौ. फूट आणि २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फूट प्रमाणे १०० चौ. फूट असे एकूण ५२० चौ. फूट बांधकाम | रू. १०० प्रती चौ. फूट | ५२,०००/- | - |
| ३ | खाद्याचे व पिण्याच्या पाण्याची भांडी - | २० मेंढया व १ मेंढानर | - | १०,०००/- | - |
| ४ | तंबू, सूती वाघर, स्थलांतरणाच्या वेळी साहित्य वाहतूक करण्याकरिता वाहतूक पिशव्या, फायबर ची बादली, खाद्याचे व पिण्याच्या पाण्याची भांडी आणि इतर साहित्य | २० मेंढया व १ मेंढानर | - | - | १५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | जंतनाशक, कीटकनाशक औषधे व खनिज विटा | २० मेंढया व १ मेंढानर | - | २,०००/- | २,०००/- |
| ६ | पशुधनाचा विमा सेवाशुल्कासह | २० मेंढया व १ मेंढानर | पशुधनाच्या किंमतीवर @ ४ टक्के + सर्व्हिस टॅक्स | ८,५००/- | ८,५००/- |
| ७ | चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातींचे ठोंबे/बेने खरेदी तसेच अझोला व मूरघास तयार करणे | २० मेंढया व १ मेंढानर | - | ११,०००/- | - |
| ८ | मेंढ्या चारण्यासाठी कुरण भाड्याने घेणे किंवा चारा विकत घेणे | २० मेंढया व १ मेंढानर | - | - | ५,०००/- |
| ९ | प्रशिक्षण | - | २,०००/- | २,०००/- | २,०००/- |
| १० | एकूण किंमत | - | - | १,६३,०००/- | ३२,५००/- |
| ११ | अनुदान @ ७५ टक्के | - | - | १,२२,२५०/- | २४,३७५/- |
| १२ | लाभधारक हिस्सा २५ टक्के | - | - | ४०,७५०/- | ८,१२५/- |

**(२) या राज्यस्तरीय योजनेंतर्गत ४० मेंढ्या + २ मेंढेनर अशा एकूण ४२ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक मेंढ्या असलेल्या मेंढपाळास मेंढीपालनासाठी पायाभूत सोई-सुविधेकरीता येणाऱ्या बाबनिहाय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

(आकडेवारी रुपयामध्ये)

| अ.क्र. | बाब | संख्या | किंमत (प्रती नग) | स्थायी गट | स्थलांतरीत गट |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेड बांधकाम - | ४२ प्रौढ मेंढ्यांसाठी प्रत्येकी १० चौ. फूट प्रमाणे ४२० चौ. फूट आणि ४० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फूट प्रमाणे २०० चौ. फूट असे एकूण ६२० चौ. फूट बांधकाम | रू. २५० प्रती चौ. फूट | १५५०००/- | - |
| २ | मोकळ्या जागेस कुंपण | ४२ प्रौढ मेंढ्यांसाठी प्रत्येकी २० चौ. फूट प्रमाणे ८४० चौ. फूट आणि ४० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फूट प्रमाणे २०० चौ. फूट असे एकूण १०४० चौ. फूट बांधकाम | रू. १०० प्रती चौ. फूट | १०४०००/- | - |
| ३ | खाद्याचे व पिण्याच्या पाण्याची भांडी - | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | २००००/- | - |
| ४ | तंबू, सूती वाघर, स्थलांतरणाच्या वेळी साहित्य वाहतूक करण्याकरिता वाहतूक पिशव्या, फायबर ची बादली, खाद्याचे व पिण्याच्या पाण्याची भांडी आणि इतर साहित्य | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | - | २००००/- |
| ५ | जंतनाशक, कीटकनाशक औषधे व खनिज विटा | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | ४०००/- | ४०००/- |
| ६ | पशुधनाचा विमा सेवाशुल्कासह | ४० मेंढया व २ मेंढेनर | पशुधनाच्या किंमतीवर @ ४ टक्के + सर्व्हिस टॅक्स | १७०००/- | १७०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातींचे ठोंबे/बेने खरेदी तसेच अझोला व मूरघास तयार करणे. | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | १५,०००/- | - |
| ८ | मेंढ्या चारण्यासाठी कुरण भाड्याने घेणे किंवा चारा विकत घेणे | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | - | ५०००/- |
| ९ | प्रशिक्षण | - | २०००/- | २०००/- | २०००/- |
| १० | एकूण किंमत | - | - | ३,१७,०००/- | ४८,०००/- |
| ११ | अनुदान @ ७५ टक्के | - | - | २,३७,७५०/- | ३६,०००/- |
| १२ | लाभधारक हिस्सा २५ टक्के | - | - | ७९,२५०/- | १२,०००/- |

"राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" या योजनेत बदल करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : पविआ-२०२४/प्र.क्र. ०३/पदु-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ५ ऑगस्ट, २०२४

**वाचा :-** १. शासन निर्णय क्र: पविआ-२०१७/प्र.क्र.६५/पदु-३, दि. २.६.२०१७
२. व्यवस्थापकीय संचालक, पुअममेंवशेविम याचे जावक क्र. पुअममेंवशेविम / तात्रिंक /२००३/२०२३,दि.२६.१२.२०२३.
३. व्यवस्थापकीय संचालक, पुअममेंवशेविम याचे जावक क्र. पुअममेंवशेविम/ तात्रिंक /२४०३/२०२४,दि. २०.०२.२०२४

**प्रस्तावना :-**

वाचा क्र. १ येथील शासन निर्णयानुसार धनगर व तत्सम जमातीमधील समाजाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्या असलेला मागासलेपणा दूर करुन स्थैर्य मिळवून देण्याच्या दृष्टीने मेंढीपालनास प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान तत्त्वावर ६ मुख्य घटकासह नवीन योजना "राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" या नावाने सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेत समाविष्ठ असलेल्या ६ घटकांसाठी घटकनिहाय लाभार्थ्यांची संख्या व आर्थिक मर्यादा निर्धारित करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत एकूण रु. ४४,५६,९२,३३८/- अनुदान वाटपासाठी व प्रशासकिय खर्च (१ टक्का) रु. ४४,५६,९२३/- असा एकूण ४५,०१,४९,२६१/- इतका निधी निर्धारित करण्यात आला आहे. सदर योजनेत आतापर्यंत रु. ४४.२४ कोटी इतका निधी खर्च झाला आहे. त्यानुसार आर्थिक उद्दिष्ट पुर्ण झाले आहे.

सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय भाषणात तत्कालीन अर्थमंत्री यांनी योजनेची फलश्रुती लक्षात घेऊन व्याप्ती वाढविण्याबाबत नंतर विचार करण्यात येईल, असे घोषित केले आहे. सदर योजनेत महामंडळाकडे सध्यास्थितीत प्रलंबित / प्रतिक्षाधिन अर्ज व महामंडळाकडे उपलब्ध असलेला निधी विचारात घेवून ही योजना पुढे चालु ठेवण्यास मा. मंत्रिमंडळाने दिनांक २३.०७.२०२४ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये धनगर व तत्सम समाजास आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी व मेंढी पालनास प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान तत्वावर "राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" ही योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजना राबवितांना आलेला अनुभव व सदर योजनेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांच्याकडे प्रतिक्षाधिन असलेल्या २५६९५ अर्जांची संख्या व उपलब्ध निधी विचारात घेऊन "राजे यशवंतराव

होळकर महामेष योजना" पुढे चालू ठेवण्याची आवश्यकता विचारात घेऊन पुढील निर्णयास मान्यता देण्यात येत आहे.:-

(१) धनगर व तत्सम समाजास सामाजिक व आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी शासन निर्णय क्र. पविआ-२०१७/प्र.क्र.६५/पदुम-३, दि. २.६.२०१७ अन्वये लागू करण्यात आलेली "राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" यापूढे चालू ठेवण्यात येत आहे.

(२) "राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" या योजनेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाकडे अखर्चित असलेला रु. २९.५५ कोटी इतका निधी चालु वित्तीय वर्षात खर्च करण्यात यावा. तसेच पुढील वर्षापासुन उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा.

(३) या योजनेतील लाभार्थ्यांचा प्रतिसाद विचारात घेऊन लाभार्थी उद्दिष्टे तसेच आर्थिक उद्दिष्टे यामध्ये अंतर्गत बदल करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात येत आहे.

(४) (i) सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणारे पशुधन (मेंढ्या व नर) यांची लाभार्थ्यांने प्रथम स्वखर्चातून महामंडळाच्या प्रक्षेत्रावरुन अथवा जनावरांच्या अधिकृत बाजारातून खालील समितीच्या उपस्थितीत खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.:-

**अ.** जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (संबंधित जिल्हा)

**आ.** पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती

**इ.** पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना

**ई.** विमा प्रतिनिधी

**उ.** लाभधारक

(ii) संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी खरेदी करण्यात आलेल्या पशुधन खरेदीच्या मुळ पावत्या तसेच खरेदी केलेले पशुधन व खरेदी समितीच्या एकत्रित फोटोसह खरेदी अहवाल पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांना सादर कराव्यात.

(iii) व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांना वरील (ii) प्रमाणे कागदपत्रे सादर केल्यानंतर ७५ टक्के अनुदानाची रक्कम ७ दिवसात थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेच्या (DBT) माध्यमातून लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी.

(iv) सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांच्या प्रक्षेत्रावरुन देण्यात येणा-या चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातीचे ठोंबे/बियाणे यासाठीचे अनुदान वगळता उर्वरित सर्व बाबींचे लाभ पूर्वीप्रमाणेच थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेच्या (DBT) माध्यमातून लाभार्थ्यांना देण्यात यावे.

(५) राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" या योजनेच्या इतर अटी, शर्ती व कार्यपध्दती शासन निर्णय क्र. पविआ२०१७/प्र.क्र.६५/पदु-३, दिनांक २.६.२०१७ प्रमाणेच राहतील.

२. सदरचा शासन निर्णय नियोजन विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र. १५६/कार्यासन १४३१, दि.२८.०२.२०२४ व वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ४९२/२०२४/व्यय-२, दि.१.०८.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८०५१७३४५७७६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NIWRUTTI BHAGUJI MARALE

Digitally signed by NIWRUTTI BHAGUJI MARALE
Date: 2024.08.05 17:49:57 +05'30'

(नि. भा. मराळे)
शासनाचे उप सचिव

प्रत -

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे- ६७.
३. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई / नागपूर.
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,
७. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
८. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
९. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१०. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
११. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१२. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. निवड नस्ती (पदु-३)

राज्यातील भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील मेंढपाळ कुटूंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्यासाठी चराई अनुदान देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पविआ-१०१९/प्र.क्र.२१६/पदुम-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २० सप्टेंबर, २०१९

वाचा:- शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक:- पविआ-१०१९/प्र.क्र.२१६/पदुम-३, दि. १६.०९.२०१९

प्रस्तावना :-

राज्यातील भटक्या जमाती - क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी विविध १३ नवीन योजना सुरू करण्यास मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून, सदर १३ योजनांमध्ये भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील मेंढपाळ कुटूंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रतिमाह रु. ६०००/- असे एकूण रु. २४०००/- चराई अनुदान देण्याचा विषय अंतर्भूत आहे.

२. मेंढपाळ कुटुंबीयांकडे असलेल्या मेंढयांच्या पालनपोषणासाठी सर्वसाधारणपणे शासकीय गायरान जमीनी, पडीक शेतजमीनी व डोंगर इत्यादी परिसरात मेंढपाळ त्यांच्या मेंढया चराईसाठी घेवून जातात. यापैकी जे क्षेत्र हे वन विभागाच्या अखत्यारीत असले, त्या क्षेत्रामध्ये मेंढपाळ व वन विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो, अनेक वेळा वाद-विवाद होतात. परिणामी, मेंढयांच्या पालनपोषणामध्ये अडचणी निर्माण होतात.

३. सदर अडचणीवर मात करण्यासाठी राज्यातील धनगर व तत्सम जमातीची बहूल लोकसंख्या असलेल्या अहमदनगर, औरंगाबाद, धुळे, कोल्हापूर, नाशीक, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर या ९ जिल्हयामध्ये प्रायोगीक तत्वावर नवीन योजना सुरू करण्यास वाचा येथील दिनांक १६.०९.२०१९ रोजीची शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. तथापि, सदर योजना राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ जिल्ह्यात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

४. वाचा येथील दिनांक १६.०९.२०१९ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ जिल्ह्यातील राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या केवळ भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील, ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढया व १ मेंढानर एवढे पशुधन असेल, अशा कुटुंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रतिमाह रु. ६,०००/- असे एकूण रु. २४,०००/- चराई अनुदान वाटप करण्याची योजना खालीलप्रमाणे राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

(१) सदर योजना राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ जिल्ह्यामध्ये राबविण्यात यावी.

(२) सदर योजनेंतर्गत राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या केवळ भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजामधील ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढया व १ मेंढानर एवढे पशुधन असेल, अशा कुटुंबांना सन २०१९-२० या वित्तीय वर्षापासून या योजनेचा लाभ देण्यात यावा.

(३) सदर योजनेमध्ये पात्र मेंढपाळ कुटुंबांना प्रतिमाह रु. ६०००/- याप्रमाणे माहे जून ते सप्टेंबर या ४ महिन्याच्या कालावधीसाठी एकूण रु. २४०००/- एवढे चराई अनुदान वाटप करण्यात यावे.

(४) जिल्हा निहाय मेंढपाळ कुटुंबांची संख्या विचारात घेऊन उक्त ३४ जिल्हयामध्ये प्रत्येक जिल्हयात कमाल २००० लाभार्थींना अनुदान देण्यात यावे.

(५) या योजनेसाठी आवश्यक असणारा निधी विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडून उपलब्ध करुन, वितरीत करण्यात येईल.

**५. योजनेचा उद्देश:-**

(१) राज्यातील भटकंती करणाऱ्या धनगर व तत्सम समाजातील पशुपालकांना पारंपारिक पद्धतीने करीत असलेल्या मेंढी / शेळीपालन या व्यवसायापासून त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करून देणे व त्याद्वारे त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करणे.

(२) माहे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढपाळ कुटुंबाना मेंढयांच्या चराईच्या अनुषंगाने येणाऱ्या अडीअडचणी/ समस्या यावर मात करणे.

(३) राज्यातील मेंढ्यांच्या संख्येमध्ये सातत्याने होत असलेली घट थांबविणे किंबहुना त्यामध्ये वाढ करून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

(४) राज्यातील मेंढी / शेळीपालन व्यवसायास चालना देऊन ग्रामीण रोजगार निर्मिती करणे.

**६. योजनेचे स्वरूप**:-

(१) सदर योजना राज्यस्तरीय योजनेंतर्गत राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ जिल्ह्यामध्ये राबविणे.

(२) सदर योजनेंतर्गत राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या केवळ भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजामधील उक्त जिल्हयातील ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढया व १ मेंढानर एवढे पशुधन असेल, अशा कुटुंबांना सन २०१९-२० या वित्तीय वर्षापासून या योजनेचा लाभ देणे.

(३) या योजनेमध्ये पात्र मेंढपाळ कुटुंबांना प्रतिमाह रु. ६०००/- याप्रमाणे माहे जून ते सप्टेंबर या ४ महिन्याच्या कालावधीसाठी एकूण रु. २४०००/- एवढे चराई अनुदान वाटप करणे.

**७. योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती**:-

(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत योजनेस व्यापक प्रसिद्धी देतील.

(२) या योजनेचा लाभ घेण्यासाठी भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातींमधील लाभार्थींचे अर्ज संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे मागविण्यात येतील.

(३) संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाकडे पाठविण्यात येतील.

(४) महामंडळ प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करुन, सर्व प्रस्ताव शिफारशीसह पदुम या विभागाकडे सादर करेल.

(५) पदुम विभाग प्राप्त झालेले पात्र अर्ज, अंतीम मान्यतेसाठी विजाभज, इमाव व विमाप्र या विभागाकडे शिफारशीसह सादर करेल.

(६) विजाभज, इमाव व विमाप्र या विभागाकडे प्राप्त झालेल्या अर्जामधून सदर योजनेमध्ये पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या निवड करुन, त्याप्रमाणे पात्र लाभार्थ्यांना योजनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे लाभ देण्यास मान्यता देईल.

(७) सदर योजनेंतर्गत विजाभज, इमाव व विमाप्र विभागाने निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांना योजनेतील लाभ देण्यासंदर्भात या विभागाकडून महामंडळास निर्देश देण्यात येतील.

(८) निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांना महामंडळामार्फत अनुदानाची रक्कम थेट हस्तांतरण पद्धतीने (DBT) लाभधारकांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

(९) सदर निर्देशप्रमाणे महामंडळाकडून योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल.

**८. जिल्हास्तरीय छाननी समितीची संरचना:-**

(i) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त - अध्यक्ष

(ii) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद - सदस्य

(iii) संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) - सदस्य

(iv) सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय - सदस्य सचिव

**९. कार्यन्वयन यंत्रणा:-**

राज्य क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेल्या सदर योजनेची अंमलबजावणी व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, लि. पुणे यांचेद्वारे करण्यात येईल.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२०२०४१४४४५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIKAS TULSHIRAM KADAM

Digitally signed by VIKAS TULSHIRAM KADAM Date: 2019.09.21 10:19:05 +05'30'

**(विकास तु. कदम)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे- ६७.
३. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई / नागपूर.
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,
७. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
८. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
९. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१०. मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१२. विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवड नस्ती (पदुम- ३).

राज्यातील भटक्या जमाती भज-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातींमधील मेंढपाळ कुटुंबाना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या ४ महिन्यासाठी चराई अनुदान देणे या योजनेच्या लाभधारक निवड प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक- पविआ-२०२३/प्र.क्र.५५५/पदु-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक- १४ मार्च, २०२४.

वाचा :- शासन निर्णय क्र. पविआ-२०१९/प्र.क्र.२०१/पदुम-३, दिनांक. २० सप्टेंबर, २०१९

शासन शुध्दीपत्रक:-

वाचा येथील शासन निर्णय, दिनांक २९.०९.२०१९ अन्वये राज्यातील भटक्या जमाती भज-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातींमधील मेंढपाळ कुटुंबाना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या ४ महिन्यासाठी चराई अनुदान देण्यासाठी लाभार्थी निवडीची प्रक्रिया क्र. ७ व ८ अन्वये अंमलबजावणीची कार्यपध्दती विहित केली आहे. त्यामध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.:-

१. शासन निर्णय क्र. पविआ-२०१९/प्र.क्र.२०१/पदुम-३, दि. २० सप्टेंबर, २०१९ मधील क्र. ७ ऐवजी पुढील मजकूराचा समावेश करण्यात येत आहे.:-

१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांच्या मार्फत योजनेस व्यापक प्रसिध्दी देऊन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील.
२. प्राप्त अर्जांची तपासणी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त करतील.
३. प्राप्त अर्जांच्या तपासणीनंतर लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी जिल्हानिहाय खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत असून सदर समिती लाभार्थ्यांची निवड करुन यादी जाहीर करेल.

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद) | - सदस्य |
| ३. सहाय्यक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण विभाग | - सदस्य |
| ४. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त | -सदस्य सचिव |

४. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त हे त्यांच्या अधिनस्त जिल्ह्यात निवड झालेल्या लाभार्थ्यांची यादी व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांना सादर करतील.

प-3
मा. स्व. का/ वार्ड
14/3

srvetmah@gmail.com

५. निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांना महामंडळामार्फत अनुदानाची रक्कम थेट हस्तांतरण पध्दतीने (DBT) लाभधारकांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

२. शासन निर्णय क्र. पविआ-२०१९/प्र.क्र.२०१६/पदुम-३, दि. २० सप्टेंबर, २०१९ मधील क्र. ८ वगळण्यात येत आहे.

३. सदर आदेश इतर मागास व बहूजन कल्याण विभागाने दि. १३.०३.२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(नि.भा. मराळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा. उप मुख्यमंत्री (गृह), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
५. महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा) /(लेखा अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
६. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व जिल्हाधिकारी
८. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे
९. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
१०. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त.
११. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)
१२. सर्व जिल्हा सहाय्यक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण विभाग
१३. मा. मंत्री (पदु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंवई.
१४. निवड नस्ती-पदु-३

**आदिवासी सामाजाच्या उन्नतीकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या धर्तीवर भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील लाभार्थ्यांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत भूमीहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरीता जागा खरेदीसाठी अनुदानस्वरुपात एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः पविआ-१०१९/प्र.क्र.२०२/पदुम-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: १६ सप्टेंबर, २०१९

**प्रस्तावना :-**

राज्यातील अनुसूचित जमाती या मागास प्रवर्गाच्या म्हणजेच आदिवासी सामाजाच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने राज्यशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या धर्तीवर राज्यातील भटक्या जमाती - क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी विविध १३ नवीन योजना सुरू करण्यास मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून, सदर १३ योजनांमध्ये भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील भूमीहीन मेंढपाळ कुटुंबासाठी राज्यस्तरीय योजनेंतर्गत अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरीता जागा खरेदीसाठी किंवा ३० वर्षाच्या भाडे करारावर जमीन भाड्याने घेण्यासाठी अनुदानस्वरुपात एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य देण्याचा विषय अंतर्भूत आहे.

२. राज्यातील भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील मेंढपाळ विविध ठिकाणी भटकंती करुन, शेळ्या-मेंढ्यांचे पालन पोषण करुन, उदर निर्वाह करतात. अशा स्वरुपाच्या भटकंतीमुळे त्यांना अनेक समास्यांना तोंड द्यावे लागते. जसे, भटकंतीवर जाताना ते सर्व कुटूंबिय समवेत जातात, त्यामुळे त्यांच्या पाल्यांना शैक्षणिक सुविधा मिळत नाहीत. परिणामी, या समाजामध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. आरोग्य सुविधेअभावी महिला व बालकांच्या प्रकृतीस्वास्थ्यांची हानी होते. नैसर्गिक आपत्ती शिवाय इतर कारणास्तव त्यांच्याकडील पशुधनाचा मृत्यू झाल्यास त्यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळत नाही. परिणामी, सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे आर्थिक परिस्थिती आणखी खालावत आहे.

३. या समाजाच्या सतत भटकंतीमुळे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर रहावे लागत असल्यामुळे, त्यांना आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीपासून वंचित रहावे लागत आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता, भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजास मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवीन योजना सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

४. भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील भूमीहीन मेंढपाळ कुटुंबासाठी राज्यस्तरीय योजनेंतर्गत अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरीता जागा खरेदीसाठी किंवा ३० वर्षाच्या भाडे करारावर जमीन भाड्याने घेण्यासाठी अनुदानस्वरुपात एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य देण्याची योजना खालीलप्रमाणे राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

(i) राज्यस्तरीय योजनेंतर्गत राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ ग्रामीण जिल्ह्यात राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या केवळ भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजामधील भूमीहीन मेंढपाळ कुटुंबासाठी सन २०१९-२० या वित्तीय वर्षापासून या योजनेचा लाभ देण्यात यावा.

(ii) उक्त मागास प्रवर्गातील ज्या मेंढपाळ कुटूंबाच्या मालकी हक्काची महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही प्रकारची शेतजमीन नाही, अशा भूमीहीन मेंढपाळ कुटूंबातील कोणत्याही एका सदस्यास (पुरुष किंवा स्त्री) या योजनेंतर्गत लाभ देण्यात यावा.

(iii) या योजनेंतर्गत भूमीहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरीता किमान १ गुंठा जागा खरेदी करण्यासाठी, जागेच्या किंमतीच्या ७५ टक्के अथवा किमान ३० वर्षासाठी भाडेकरारावर जागा घेण्यासाठी भाड्यापोटी द्यावयाच्या रकमेच्या ७५ टक्के रक्कम एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य म्हणून कमाल रु. ५००००/- मर्यादेत अनुदान देण्यात यावे.

(iv) या योजनेंतर्गत प्रथम टप्प्यात २००० लाभार्थींना वरीलप्रमाणे अनुदान देण्यात यावे.

(v) सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना द्यावयाच्या ७५ टक्के अनुदानासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता एकूण रु. १०.०० कोटी एवढ्या निधीस मान्यता देण्यात येत आहे.

(vi) या योजनेसाठी आवश्यक असणारा निधी विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडून उपलब्ध करुन, वितरीत करण्यात येईल.

**५. योजनेचा उद्देश:-**

(i) राज्यातील भटकंती करणाऱ्या धनगर व तत्सम समाजातील पशुपालकांना पारंपारिक पद्धतीने करीत असलेल्या मेंढी / शेळीपालन या व्यवसायापासून त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करून देणे व त्याद्वारे त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करणे.

(ii) राज्यामध्ये बंदिस्त मेंढी / शेळीपालन व्यवसायास चालना देणे.

(iii) मेंढीपालन व्यवसायामध्ये अर्ध बंदिस्त किंवा बंदिस्त मेंढीपालन ही संकल्पना प्रभावीपणे राबविणे.

(iv) मेंढीपालनाचा पारंपारिक व्यवसाय असणाऱ्या समाजातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.

(v) राज्यामधील शेळ्यांच्या संख्येमध्ये वाढ करून, राज्याच्या कृषि व संलग्न क्षेत्रातील स्थूल उत्पन्न वाढीच्या दराचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत करणे.

(vi) स्थायी स्वरुपाच्या ठाणबंद पध्दतीने शेळीपालन करण्यासाठी पशुपालकांना आकर्षित करुन त्यांना स्थैर्य निर्माण करुन देणे.

(vii) राज्यातील मेंढ्यांच्या संख्येमध्ये सातत्याने होत असलेली घट थांबविणे किंबहुना त्यामध्ये वाढ करून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

(viii) राज्यातील मेंढी / शेळीपालन व्यवसायास चालना देऊन ग्रामीण रोजगार निर्मिती करणे.

**६. <u>योजनेचे स्वरूप:-</u>**

(१) सदर योजना राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या केवळ भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील ज्या मेंढपाळ कुटूंबाच्या मालकी हक्काची महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही प्रकारची शेतजमीन नाही, अशा भूमीहीन मेंढपाळ कुटूंबातील कोणत्याही एका सदस्यास (पुरुष किंवा स्त्री) या योजनेचा लाभ देणे.

(२) या योजनेमध्ये सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून भूमीहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरीता किमान १ गुंठा जागा खरेदी करण्यासाठी, जागेच्या किंमतीच्या ७५ टक्के अथवा किमान ३० वर्षासाठी भाडेकरारावर जागा घेण्यासाठी भाड्यापोटी द्यावयाच्या रकमेच्या ७५ टक्के रक्कम एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य म्हणून कमाल रु. ५० हजार एवढे अनुदान वाटप करणे.

(३) सदर योजनेमध्ये ७५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा राहील व २५ टक्के हिश्याची रक्कम लाभार्थ्याने उभारणे आवश्यक आहे.

(४) २० मेंढया/ शेळ्या व १ मेंढानर / बोकड एवढे पशुधन संगोपन करण्याकरिता सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे जागेची आवश्यकता असते:-

(i) २०+ १ मेंढी/ शेळी गटासाठी शेड बांधकाम

(अ) २१ प्रौढ मेंढयां / शेळ्यांसाठी १० चौ. फुट प्रमाणे २१० चौ. फुट

(ब) २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फुट प्रमाणे १०० चौ. फुट

(क) एकुण बांधकाम ३१० चौ. फुट

(ii) मोकळया जागेस कुंपण उभारणी

(अ) २१ प्रौढ मेंढया / शेळ्यांसाठी २० चौ. फुट प्रमाणे ४२० चौ. फुट

(ब) २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फुट प्रमाणे १०० चौ.फुट

(क) एकुण ५२० चौ. फुट क्षेत्रास कुंपण

(५) २० मेंढया/ शेळ्या व १ मेंढानर / बोकड एवढे पशुधन संगोपन करण्याकरिता एकूण शेड बांधकामाकरिता ३१० चौ. फुट व ५२० चौ. फुट क्षेत्रास कुंपण अशी एकूण ८३० चौ. फुट जागेची तसेच चाऱ्याची साठवणूक याकरिता लागणारी जागा विचारात घेऊन साधारणपणे १००० चौ. फुट म्हणजेच १ गुंठा जागा पुरेशी आहे.

**७. योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती:-**

(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत योजनेस व्यापक प्रसिद्धी देऊन, याकरिता जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे मार्फत अर्ज मागविण्यात येतील. त्यानुसार खालील निवड समिती मार्फत लाभार्थीची निवड करण्यात येईल:-:-

| | |
|---|---|
| (i) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त - | अध्यक्ष |
| (ii) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद - | सदस्य |
| (iii) संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) - | सदस्य |
| (iv) सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय- | सदस्य सचिव |

(२) निवड करण्यात आलेल्या लाभार्थीची अंतिम यादी प्रसिद्ध करून त्यानुसार लाभधारकांना जागा खरेदीकरिता अथवा जागा भाडेकरारावर घेण्याबाबत कळविण्यात येईल.

(३) निवड झालेल्या लाभार्थीनी विकत घ्यावयाच्या किंवा ३० वर्षाच्या भाडे करारावर घ्यावयाच्या जमिनीची तपशील माहिती व कागदपत्रे संबधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेकडे सादर करावीत. त्यानुसार जागेची प्रत्यक्ष पडताळणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे मार्फत करून, अनुदानाचा प्रस्ताव जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे मार्फत महामंडळाकडे पाठवावा. त्यानंतर लाभार्थ्यांच्या हिश्श्याची रक्कम बँक खात्यात जमा केल्याची खात्री करून, शासकीय देय असलेले ७५ % अनुदान महामंडळामार्फत थेट हस्तांतरण पद्धतीने (DBT) लाभधारकांच्या बँक खातेवर जमा करण्यात येईल.

(४) लाभार्थ्याने जमीन खरेदी अथवा ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडे करारावर जमीन घेतल्याचे कागदपत्रांची सक्षम प्राधिकाऱ्याकडे नोंदणी करील, नोंदणी करण्यात आलेल्या कागदपत्रांची सत्यप्रत महामंडळाकडे जमा करेल.

(५) लाभार्थ्यांने सदर योजनेच्या अंमलबजावणी चूक केल्याचे दिसून आल्यास, त्या लाभार्थ्यांकडून अनुदानाची रक्कम दंडासह वसूल करण्याबाबत विहीत महसूल कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

८. **कार्यन्वयन यंत्रणा:-**

राज्य क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेल्या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, लि. पुणे यांचेद्वारे करण्यात येईल.

९. सदर योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्याची कार्यवाही विभागाच्या स्तरावर करण्यात येईल.

१०. सदर आदेश विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.२०/उस, दिनांक १४.८.२०१९, नियोजन विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र.१३२/१४३१, दिनांक १९.८.२०१९ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ३८५/व्यय-२, दिनांक २८.८.२०१९ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१११५४४२५६००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIKAS TULSHIRAM KADAM

(विकास तु. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे- ६७.
३. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई / नागपूर.
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,
७. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
८. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
९. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१०. मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१२. विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवड नस्ती (पदुम- ३).

(६)

भटक्या जमाती भज-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील लाभार्थ्यांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत भूमीहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरीता जागा खरेदीसाठी अनुदान स्वरुपात एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक- पविआ-२०२३/प्र.क्र.४१/पदु-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक- १२ मार्च, २०२४.

वाचा :- शासन निर्णय क्र. पविआ-२०१९/प्र.क्र.२०२/पदुम-३, दिनांक. १६ सप्टेंबर, २०१९

शासन शुध्दीपत्रक:-

वाचा येथील शासन निर्णय, दिनांक १६.०९.२०१९ अन्वये भटक्या जमाती भज-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील लाभार्थ्यांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत भूमीहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरीता जागा खरेदीसाठी अनुदान देण्यासाठी लाभार्थी निवडीसाठी शासन निर्णयातील क्र. ७ अन्वये निवड समिती गठित करण्यात आली आहे. सदर निवड समिती रद्द करुन पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.:-

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद) | - सदस्य |
| ३. सहाय्यक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण विभाग | - सदस्य |
| ४. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त | -सदस्य सचिव |

२. योजनेच्या इतर अटी व शर्ती, स्वरुप, कार्यपध्दती पुर्वीप्रमाणे कायम राहतील.

३. सदर आदेश इतर मागास व बहूजन कल्याण विभागाने दि. १२.०३.२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(नि.भा. मराळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा. उप मुख्यमंत्री (गृह), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२

४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
५. महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा) /(लेखा अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
६. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व जिल्हाधिकारी
८. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे
९. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
१०. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त.
११. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)
१२. सर्व जिल्हा सहाय्यक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण विभाग
१३. मा. मंत्री (पदु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती-पदु-३

**ग्रामीण परसातील कुक्कुटपालन संकल्पने अंतर्गत भटक्या जमाती (क) या प्रवर्गासाठी धनगर व तत्सम जमातीसाठी ७५ टक्के अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारीत देशी प्रजातीच्या १०० कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी व संगोपनासाठी अर्थसहाय्य.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्र. कुक्कुट-२०१९/प्र.क्र.९३/पदुम-४,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१९.

**प्रस्तावना :-**

राज्यातील ग्रामीण भागामध्ये कुक्कुट पालन हा पूरक व्यवसाय न राहता अर्थाजनाचा स्वतंत्र स्त्रोत म्हणून पुढे येत आहे. पारंपारिक कुक्कुटपालन पद्धतीला तंत्रज्ञानाची जोड देणे, लाभार्थ्यांचे कौशल्य विकसित करणे, कुक्कुट पक्षी व्यवस्थापनामध्ये सुधारणा करणे आणि संतुलित आहाराची गरज लक्षात घेऊन परसातील कुक्कुटपालन व पशुसंवर्धनविषयक इतर योजना राबविणे तसेच, स्वयंरोजगार निर्मिती करुन कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न वाढविणेस्तव ग्रामीण परसातील कुक्कुटपालनास चालना देण्यासाठी राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून उर्वरित ३४ जिल्ह्यांमधील भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीसाठी ७५ टक्के अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारीत देशी प्रजातीचे १०० पक्षी खरेदी व संगोपनासाठी अर्थसहाय्य पुरविण्याच्या योजनेस मा. मंत्रिमंडळाने दि. ३० जुलै, २०१९ रोजी आयोजित मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

ग्रामीण परसातील कुक्कुटपालनास चालना देणेसाठी भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीसाठी ७५ टक्के अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारीत देशी प्रजातीच्या १०० पक्ष्यांच्या खरेदी व संगोपनासाठी अर्थसहाय्य पुरविणे ही योजना सन २०१९-२० मध्ये राबविण्यास याव्दारे, शासनाची प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**योजनेचे कार्यक्षेत्र :-**

राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता, उर्वरित ३४ जिल्ह्यांमधील महागनगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत व कटक मंडळे वगळून इतर भागात ही योजना राबविण्यात यावी.

**योजनेचे स्वरुप :-**

या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यामधील भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीच्या १,००० लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी. निवड झालेल्या प्रत्येक लाभार्थ्यास चार आठवडे वयाच्या सुधारीत देशी प्रजातीच्या (CARI Approved Low Input Technology Birds) १०० मिश्र कुक्कुट पक्ष्यांचा पुरवठा करण्यात यावा. प्रति जिल्हा १,००० याप्रमाणे एकूण ३४,००० लाभार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात यावा. निवड झालेल्या लाभार्थ्यांना प्रती पक्षी २.० कि. ग्रॅ. याप्रमाणे २०० कि. ग्रॅ. या मर्यादेत कुक्कुट पक्षी खाद्याचा पुरवठा करण्यात यावा. यासाठी सर्व लाभार्थ्यांना प्रकल्प किंमतीच्या ७५ टक्के शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील. उर्वरित २५ टक्के हिस्सा लाभार्थ्याने स्वत: उभारावयाचा आहे. प्रत्यक्ष योजना राबवितांना प्रतीपक्षी व खाद्याच्या प्रतीकिलो किंमतीमध्ये वाढ झाल्यास अनुदानाव्यतीरीक्ताचा खर्च लाभार्थ्यांने स्वत: करावयाचा आहे.

**योजनेचे आर्थिक निकष :-**

या प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या लाभाचे बाबनिहाय स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | तपशील | संख्या | खर्च (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ४ आठवडे वयाच्या सुधारीत देशी प्रजातीच्या पक्ष्यांची खरेदी किंमत<br>(प्रती पक्षी रु. ६०/- प्रमाणे) | १०० | रु. ६,०००/- |
| २ | दोन महिन्याचे कुक्कुट पक्षी खाद्य<br>(प्रती पक्षी २०. कि.ग्रॅ . या प्रमाणात)<br>दर रु. ३०/- प्रती किलो | २०० कि.ग्रॅ . | रु. ६,०००/- |
| | | एकूण प्रकल्प किंमत | रु. १२,०००/- |
| | | लाभार्थी हिस्सा | रु. ३,०००/- |
| | | शासन अनुदान | रु. ९,०००/- |

**बाबनिहाय एकूण ३४ जिल्हयांसाठी योजना खर्च**

| अ. क्र. | तपशील | संख्या | खर्च (लाखात) |
|---|---|---|---|
| १ | ४ आठवडे वयाच्या सुधारीत देशी प्रजातीच्या पक्ष्यांची खरेदी किंमत<br>(प्रती पक्षी रु.६०/- प्रमाणे) | ३४,००० | रु. २,०४० .०० |
| २ | दोन महिन्याचे कुक्कुट पक्षी खाद्य<br>(प्रती पक्षी २०. कि.ग्रॅ . या प्रमाणात)<br>दर रु. ३०/- प्रती किलो | ६८,००० | रु. २,०४० .०० |
| | | **एकूण प्रकल्प किंमत** | **रु. ४,०८०.००** |
| | | २५ टक्के लाभार्थी हिस्सा | रु. १,०२०.०० |
| | | **७५ टक्के शासन अनुदान** | **रु. ३,०६०.००** |

**लाभार्थी निवडीचे निकष :-**

१. लाभार्थी हा भटक्या जमाती (क) या धनगर व तत्सम जमाती प्रवर्गातील जात प्रमाणपत्र धारण करणारा व १८ ते ६० या वयोगटातील असावा.
२. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात यावा.
३. परसातील कुक्कुटपालनासाठी निवडलेल्या लाभार्थ्याकडे स्वतःची पुरेशी जागा असावी.
४. लाभार्थी निवडताना भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीतील ३० टक्के महिला व ३ टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत प्राधान्य देण्यात यावे.
५. योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थ्याने करावयाच्या अर्जाचा नमुना आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी निश्चित करुन, तो सर्व संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिति यांच्याकडे उपलब्ध करुन देण्यात यावा.

६. पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती यांनी या योजनेंतर्गत लाभ देण्यासाठी विहीत मुदतीत अर्ज स्विकारुन असे सर्व अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांचे शिफारशीसह जिल्हा पशुसवंर्धन उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीच्या मान्यतेसाठी जिल्हास्तरीय समिती यांचेकडे सादर करावेत.

**योजना राबविण्याची कार्यपद्धती :-**

सदरची योजना राबविण्यासाठी संबंधित जिल्हयाचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | : अध्यक्ष |
| २. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद | : सदस्य |
| ३. सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण (राज्यस्तर ) | : सदस्य |
| ४. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र) अथवा, पशुधन विकास अधिकारी, सघन कुक्कुट विकास प्रकल्प उपलब्ध असल्यास यापैकी एक | : सदस्य |
| ५. पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी नामनिर्देशित करावे) | : सदस्य |
| ६. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय) | : सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची कार्ये :-**

जिल्हयातील भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीच्या लोकसंखेच्या प्रमाणात तालुकानिहाय लक्षांक निश्चित करुन , प्राप्त पात्र अर्जातून सोडत पध्दतीने लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

१. योजनेअंतर्गत लाभार्थींची निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तालुकास्तरावर एकदिवसीय कुक्कुट प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात यावे. प्रशिक्षण वर्गासाठी कुठल्याही स्वरुपाची आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली जाणार नाही.
२. लाभार्थींच्या एकदिवसीय प्रशिक्षणासाठी तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी यांच्या सेवा उपयोगात आणाव्यात.
३. लाभार्थ्याने प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर स्वखर्चाने पक्ष्यांसाठी निवारा उभारावयाचा आहे.
४. लाभार्थ्याने पक्ष्यासाठी निवारा, कुक्कुट खाद्य व प्रत्यक्ष पक्ष्यांची खरेदी केल्याची खातरजमा स्थानिक पशुवैद्यकीय संस्थाप्रमुख व पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी संयुक्तरित्या करून, तसा अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे सादर केल्यानंतरच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त देय अनुदान डीबीटीद्वारे (थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने) लाभार्थ्याच्या बँक खात्यात वर्ग करतील.
५. एखादया तालुक्यात लाभार्थीची संख्या किमान लाभार्थी संख्येपेक्षा कमी आढळून आल्यास, जिल्हास्तरीय सनियंत्रन समितीच्या मान्यतेने उर्वरित लक्षांक इतर तालुक्याकडे वर्ग करण्यात येऊ शकेल.

६. एखाद्या जिल्ह्यात लाभार्थ्यांची संख्या किमान लाभार्थी संख्येपेक्षा कमी आढळून आल्यास, आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांच्या मान्यतेने उर्वरित लक्ष्यांक इतर जिल्ह्याकडे वर्ग करण्यात येऊ शकेल.

**कार्यान्वयण यंत्रणा :-**

सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी तसेच , आहरण व संवितरण अधिकारी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे राहतील. विभागीय स्तरावर संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन, पुणे हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

**योजनेचे सनियंत्रण आणि मुल्यमापन :-**

ज्या पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रात सदरची योजना राबविली जाईल, त्या संस्थेच्या प्रमुखाने सदर योजनेचा १०० टक्के पाठपुरावा करावा. तसेच, रोगप्रतिबंधक लसीकरण आणि इतर बाबींसाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे. पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती यांनी किमान ५० टक्के गटांची पडताळणी करावी. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी प्रत्येकी किमान १० टक्के गटांची पडताळणी करावी.

प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व) यांनी त्यांच्या विभागातील योजनेच्या अंमलबजावणीचा मुल्यमापन अहवाल आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांना वित्तीय वर्ष संपल्यावर पुढील तीन महिन्याच्या आत सादर करावा. आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी राज्याचा एकत्रित मुल्यमापन अहवाल त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करावा.

**योजनेचा वित्तीय भार :-**

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातींसाठी सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविणे या अंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्ग कल्याण विभागाने सन २०१९- २० मध्ये अर्थसंकल्पीत केलेल्या निधीमधून या योजनेसाठी रु. ३०६०.०० लक्ष निधी उपलब्ध होणार आहे.

**योजनेसाठी नवीन लेखाशीर्ष :-**

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी नवीन लेखाशिर्ष तात्काळ शासनास प्रस्तावित करावे. सदर प्रस्तावित लेखाशीर्षास, नियोजन, वित्त विभाग व मा. महालेखापाल, मुंबई यांची मान्यता प्रदान करुन घेवून तसे कळविण्यात येईल.

**योजना अंमलबजावणी मार्गदर्शक सूचना :-**

भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम लाभार्थींना लाभ देण्याकरीता ग्रामीण भागात परसातील कुक्कुटपालनाच्या माध्यमातून अंडी व मांस उत्पादनात वाढ घडवून आणणे, उच्चतम पोषणमुल्य असलेल्या अंड्यांचा मानवी आहारात जास्तीत जास्त समावेश करणे, कुक्कुट मांस उत्पादन वाढविणे व भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम बेरोजगारांना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सूचना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या स्तरावरुन तात्काळ सर्व संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात.

सदरचा शासन निर्णय विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्ग कल्याण विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने तसेच, वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.३८३ / २०१९ / व्यय-२, दि. १३.०९.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून, त्याचा सांकेताक क्र. २०१९०९१६१६१५३७३६०१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anoop Kumar

(अनूप कुमार)
प्रधान सचिव (पदुम)

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
२. मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
५. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, (सर्व).
६. प्रधान सचिव, वित्त विभाग (व्यय-२ / अर्थ-१५) मंत्रालय मुंबई
७. अपर मुख्य सचिव, (नियोजन) मंत्रालय मुंबई
८. प्रधान सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्ग कल्याण विभाग मंत्रालय मुंबई
९. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व संबंधित).
११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ / २, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१३. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, (सर्व).
१४. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, (सर्व संबंधित)
१५. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व संबंधित)
१६. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई
१७. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई
१८. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई
१९. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई
२०. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई
२१. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई
२२. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई
२३. निवड नस्ती (पदुम-४).

(६)

**ग्रामीण परसातील कुक्कुटपालन संकल्पने अंतर्गत भटक्या जमाती (क) या प्रवर्गासाठी धनगर व तत्सम जमातीसाठी ७५ टक्के अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारीत देशी प्रजातीच्या १०० कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी व संगोपनासाठी अर्थसहाय्य.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्र. कुक्कुट-२०१९/प्र.क्र.९३/पदुम-४,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ नोव्हेंबर, २०१९.

वाचा :- १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. कुक्कुट-२०१९/ प्र.क्र.९३/पदुम-४, दि.१६.०९.२०१९.
२. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे पत्र क्र.कुक्कुट-२०१९/प्र.क्र.१०७/.१०८४३/पसं-१३ पुणे, दि.१७.१०.२०१९

**शासन शुध्दीपत्रक :-**

वाचा-१ येथील दि.१६.०९.२०१९ च्या शासन निर्णयातील पृ. क्र. २ वरील योजनेचे आर्थिक निकष या खालील कोष्टकामधील अ. क्र. २ येथील तपशीलामधील प्रति पक्षी २०.०० कि. ग्रॅ. ऐवजी **प्रति पक्षी २.०० कि. ग्रॅ.** तसेच, त्याखालील दुस-या कोष्टकामधील बाबनिहाय एकूण ३४ जिल्ह्यांसाठी योजना खर्च या मधील अ. क्र. १ येथील ३४,००० संख्या ऐवजी **३४,००,०००** व त्या खालील अ. क्र. २ येथील तपशीलामध्ये प्रतिपक्षी २० कि. ग्रॅ. ऐवजी **प्रतिपक्षी २.०० कि. ग्रॅ.** आणि ६८,००० या संख्ये ऐवजी **६८,००,०००** असे वाचावे.

हे शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली असून, त्याचा सांकेताक क्र. २०१९१११८१२०५०८९७०१ असा आहे. सदर शासन शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anoop Kumar

Digitally signed by Anoop Kumar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=257f78acf3ca20d9e91d7a73a76aa0240463e4aafdd4d13da68918dc20badfe6, serialNumber=1c2ea608849bdb612849b6c8878f95607059b530ff717c8e39c09d06b394e02b, cn=Anoop Kumar
Date: 2019.11.18 12:08:19 +05'30'

(अनूप कुमार)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
२. मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
५. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, (सर्व).
६. प्रधान सचिव, वित्त विभाग (व्यय-२ / अर्थ-१५) मंत्रालय मुंबई
७. अपर मुख्य सचिव, (नियोजन) मंत्रालय मुंबई

८. प्रधान सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्ग कल्याण विभाग मंत्रालय मुंबई
९. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व संबंधित).
११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ / २, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१३. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, (सर्व).
१४. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, (सर्व संबंधित)
१५. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व संबंधित)
१६. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई
१७. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई
१८. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई
१९. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई
२०. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई
२१. नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई
२२. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई
२३. निवड नस्ती (पदुम-४).